सत्यमेव जयते

## महाराष्ट्र शासन, आरोग्य सेवा

स्व. इंदिरा गांधी स्मृती (उपजिल्हा) रुग्णालय भिवंडी

कचेरीपाडा, अग्निशमन कार्यालयासमोर, वाडा -भिवंडी रोड, भिवंडी ४२१३०२

कार्यालय ☎ ०२५२२-२२६२८२ email - igmbhiwandi@gmail.com

जाक्रं.उजिरुभि/कंत्राटी/स्वच्छता सेवा/जाहीरात/ 3593 /२५ दिनांकः- ०६/०६/२०२५

# स्वच्छता सेवेकरीता दरपत्रक मागविण्यासाठी जाहीर सुचना

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता मा. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे खालील नमूद केलेल्या कामासाठी सिलबंद लखोटयातुन विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

**स्वच्छता सेवेसाठी किमान मासिक वेतन रक्कम हे सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रं पदनि २०१८/प्र.क्रं. ३२८/आरोग्य ३ दि.१७-०३-२०२० आणि शासन निर्णय क्रमांक प्रशामा-१२२२/प्र.क्रं.१/आरोग्य -७, दिनांक २१ एप्रिल २०२२ च्या अधिन राहील.**

| | | |
|---|---|---|
| १ | कामाचे नाव | उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे दैनंदिन स्वरुपात संपूर्ण रुग्णालयाची स्वच्छता करणे. |
| २ | दरपत्रक भरणेसाठी पात्रता | १) सर्व संस्था/कंत्राटदार हे ठाणे जिल्हयातील नोंदणी असलेले आवश्यक आहेत.<br>२) सुशिक्षित बेरोजगारांची कार्यरत सेवा सोसायटी/संस्था/तत्सम प्रकारची नोंदणीकृत संस्था.<br>३) कार्यरत मजुर सहकारी बचत गट.<br>४) महिला स्वयंसेवी बचत गट.<br>५) शासकीय/निमशासकीय कार्यालयास आऊटसोर्सिंगद्वारा स्वच्छता सेवा पूरविलेली अनुभवी कंत्राटदार.<br>६) संबधित संस्थेच्या नावे पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक.<br>७) **सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रं पदनि २०१८/प्र.क्रं. ३२८/आरोग्य ३ दि.१७-०३-२०२० आणि शासन निर्णय क्रमांक प्रशामा-१२२२/प्र.क्रं.१/आरोग्य -७, दिनांक २१ एप्रिल २०२२ नुसार किमान वेतन नुसार दरपत्रक सर्व करांसहीत देणे आवश्यक आहे.** |
| ३ | कामाचा कालावधी | सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता शासन निर्णय क्रमांकः भांखरा २०२१/प्र.क्र./उद्योग-४ दिनांक ०७ मे २०२१ च्या अधिन राहून किंवा राज्यस्तरावरुन / वरिष्ठ कार्यालयाकडून ई-निविदा प्रक्रिया होईपर्यंत जे अगोदर घडेल तोपर्यंत. |
| ४ | दरपत्रकासोबत आवश्यक कागदपत्रे | १) बेरोजगार व मजूर संस्था असलेस संस्था नोंदणी अधिनियमाप्रमाणे नोंदणीप्रमाणपत्र.<br>२) बचत गटाचे बाबतीत ज्या तालुक्यात गट येतो त्या तालुक्याचे गटविकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र.<br>३) संस्थेचे नावे पॅन कार्ड आवश्यक.<br>४) राष्ट्रीयकृत अथवा शेडयुल बँकेत खाते.<br>५) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र. |
| ५ | दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण | मा. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी, जि. ठाणे यांचे कार्यालय. |
| ६ | दरपत्रक सादर करण्याचे अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १३ जून २०२५ सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| ७ | दरपत्रक उघडण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दिनांक १६ जून २०२५ दुपारी १२:३० वाजता दरपत्रक उघडणारे व्यक्ती, संस्था यांनी सदर वेळी स्वत: उपस्थित रहावे. उपस्थित न राहिल्यास दोन सदस्यीय समितीसमोर दरपत्रक उघडण्यात येतील. |
| ८ | दरपत्रकाचे अधिकार | मा. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी, जि. ठाणे. |

D:\gawai igm data\QUOTATION\quotation.docx123

Scanned with CamScanner

कामाची माहिती :- उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे दैनंदिन स्वरुपात संपूर्ण रुग्णालयाची स्वच्छता करणे.

| | | |
|---|---|---|
| १ | स्वच्छतेचे क्षेत्र | रुग्णालयीन सर्व बाहयरुग्ण, आंतररुग्ण विभाग, प्रसाधन गृहे, खिडक्या, दारे, छत, शवविच्छेदनगृह परिसर, रुग्णालयीन अंतर्गत रस्ते, संपूर्ण आवार. |
| २ | दैनंदिन कामाचे स्वरुप व व्याप्ती | १) दररोज सकाळी, दुपारी व रात्री बाहयरुग्ण, आंतररुग्ण विभाग, शौचालये, बेसिन, स्नानगृह, दरवाजे, खिडक्या स्वच्छ करणे.<br>२) दररोज रुग्णालय आवारातील सर्व इमारती परिसरातील कचरा साफ करणे, उचलणे व त्याची विहित पध्दतीने विल्हेवाट लावणे.<br>३) गटारे, रस्ते, पेव्हर ब्लॉक मोकळी जागा यावर केरसुणी वापरुन कचरा, धूळ काढणे, स्वच्छता करणे. |
| ३ | आठवडयातील १ दिवस कामकाजाचे स्वरुप व व्याप्ती | दर सोमवार, रुग्णालय आवारातील पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण भागातील खुरटी झाडे, झुडपे, गवत काढणे, पालापाचोळा उचलणे व त्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावणे. |
| ४ | आवश्यक मनुष्यबळ व साहित्य ३ महिन्यांसाठी | १० कामगार:- त्यातील ४ पुरुष व ६ महिला यांना खालीलप्रमाणे साहित्य कामगारांना पूरविण्याचे आहे.<br>१) नाराळाची केरसुनी - महिन्याला २ याप्रमाणे<br>२) छताचा कचरा काढण्यााठी लांब दांडयाची प्लास्टीकची केरसुनी - महिन्याला २ याप्रमाणे<br>३) मॉपिंग साहित्य - महिन्याला ६ याप्रमाणे<br>४) काळे फिनाईल - महिन्याला ५ लिटर याप्रमाणे<br>५) पांढरे फिनाईल - महिन्याला ५ लिटर याप्रमाणे<br>६) फावडे - ०२ नग<br>७) घमेले - ०२ नग<br>८) कोयता - ०२ नग |
| ५ | कामगारांना पूरविण्याचे साहित्य | हातमोजे, बुट आणि गणवेश |
| ६ | रुग्णालयाकडून देण्यात येणारे साहित्य | निरंक |

कामाच्या अटी व शर्ती:-

१) रुग्णालयातील स्वच्छता ही दररोज दिलेल्या वेळेत करावी लागेल.
२) रुग्णालयातील सर्व विभाग व मोकळी जागा गरजेनुसार स्वच्छ करायचे आहेत.
३) स्वच्छता सेवा असमाधानकारक असल्यास एकूण देयकातील ०.५ टक्के एवढी रक्कम दंडनिय रक्कम म्हणून वसुल करण्यात येईल.
४) संस्थेने / कंत्राटदाराने कामाचे देयक दर महिन्याच्या ५ तारखेच्या आत मुळ दोन प्रतिसह सादर करावे. महिन्याचे सर्व दिवस स्वच्छता कामाचे असतील. कामागारांचे हजेरीपत्रक ठेवण्यात यावे. कामगारांचे नाव, पत्ता, फोटो, आधारकार्ड प्रत, बँक खाते तपशिल, मोबाईल क्रमांकासह करारासोबत कार्यालयात जमा करण्यात यावा.
५) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशामा-१२२२/प्र.क्रं.१/आरोग्य -७, दिनांक २१ एप्रिल २०२२ नुसार किमान वेतन कर्मचाऱ्यांना वेतन अदा करणे बंधनकारक राहिल.
६) कार्यआदेश दरपत्रक स्विकृतीनंतर ७ दिवसांचे आत करारापत्र पूर्ण करुन द्यावे लागेल.
७) रु. १००/- च्या गैरन्यायिक बंधपत्रावर कार्यादेश दिल्यानंतर तयार करुन द्यावे लागेल.
८) कामाची देयकाची अदायगी, अनुदान उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
९) शासकीय नियमानुसार प्राप्तीकर, जीएसटी, टीडीएस देयकातुन वजा करण्यात येईल.

D:\gawai igm data\QUOTATION\quotation.docx124

Scanned with CamScanner

१०) नियुक्त करण्यात येणारे कामगारांना त्यांचे रोजंदारी/श्रमिक वेतन देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची आहे. संबधित कामगाराच्या बँक खातेमध्येच वेतन जमा करणे अनिवार्य आहे व शासन निर्णय क्रं पदनि २०१८/प्र.क्रं. ३२८/आरोग्य ३ दि.१७-०३-२०२० आणि शासन निर्णय क्रमांक प्रशामा-१२२२/प्र.क्र.१/आरोग्य -७, दिनांक २१ एप्रिल २०२२ नुसार कामगारांना दरमहा मंजूर केलेले वेतन व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वाट्याचे EPF, ESIC, LWF चा तसेच व्यवसाय कराचा भरणा केल्याचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. याबाबत कोणताही कामगार खालील सही करणार यांचेकडे तक्रार, गाऱ्हाणे घेऊन येणार नाहीत. याची जबाबदारी कंत्राटदार / संस्था यांची राहील.

११) कामगारांची दैनंदिन हजेरी सहाय्यक अधिसेविका / परिसेविका घेतील.

१२) करार झाल्यापासुन ते सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता शासन निर्णय क्रमांक: भांखस २०२१/प्र.क्र./ उद्योग-४, दिनांक ०७ मे २०२१ च्या अधिन राहून किंवा किंवा राज्यस्तरीय / वरिष्ठ कार्यालयाकडून निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत राहील.

१३) दरपत्रकाचे सर्व अधिकार मा. जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे / वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी यांचेकडे राहतील.

१४) शासकीय रुग्णालय, कार्यालय, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायती, ग्रामपंचायती येथे स्वच्छता सेवेचा अनुभव असलेले ठाणे जिल्हातील संस्था / कंत्राटदार यांना प्राधान्य देण्यात येईल.

१५) सर्व संस्था / कंत्राटदार हे ठाणे जिल्हयातील नोंदणी असलेले आवश्यक आहेत. सुशिक्षित बेरोजगारांची कार्यरत सेवा सोसायटी संस्था / तत्सम नोंदणीकृत संस्था कार्यरत मजुर सहकारी संस्था / महिला स्वयंसेवी बचत गट शासकीय निमशासकीय कार्यालयास आऊटसोर्सिंगद्वारा स्वच्छता सेवा पुरविलेले अनुभवी कंत्राटदार पात्र राहतील.

१६) पॅन कार्ड, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र, उद्योग आधार नोंदणी प्रमाणपत्र हे कागदपत्रे नसलेले, काळया यादीतील, यापूर्वी स्वच्छता सेवा देताना अव्यवहार्य, तक्रार असलेले कंत्राटदार, विहित पध्दतीने व वेळेवर दरपत्रक न देता उशिरा दरपत्रक दिलेले संस्था / कंत्राटदार, कामाचा विहित नमुना चुकीच्या पध्दतीने भरलेले, दरपत्रकात खाडाखोड केलेले कंत्राटदार / संस्था अपात्र राहतील याची नोंद घ्यावी.

१७) निविदा स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्वस्वी अधिकार वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी यांना राहतील.

**टिप:- दरपत्रक उघडताना कंत्राटदार / संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असलेचे त्यांचे सोबत कंत्राटदार / संस्थेचे चेअरमन / अध्यक्ष यांचे स्वाक्षरीचे पत्र देण्यात यावे. सदर व्यक्तीने स्वत:चे आधारकार्ड सोबत आणणे आवश्यक आहे.**

(डॉ. माधवी पंदारे)
वैद्यकिय अधिक्षक
स्व. इंदिरा गांधी स्मृती
उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी

D:\gawai igm data\QUOTATION\quotation.docx125

Scanned with CamScanner

दरपत्रक सादर करण्याचा नमुना
संस्थेचे / कंत्राटदाराचे लेटरपॅडवर

दिनांक :-

प्रति,
मा. वैद्यकीय अधिक्षक
उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी

विषय:- उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे स्वच्छता सेवेसाठी
दरपत्रक सादर करणेबाबत.

संदर्भ:- दिनांक ०६/०६/ २०२५ रोजी प्रसिध्द झालेली दरपत्रक सुचना क्रमांक
उजिरुभि/कंत्राटी/स्वच्छता सेवा/जाहीरात/ / २५ दिनांक ०६/०६/२०२५

महोदया,

उपरोक्त वरील संदर्भिय दरपत्रक सुचना, कामाचे अटी व शर्तींच्या अधिन राहून आणि प्रत्यक्ष कामाची पाहणी करुन आम्ही / मी खालीलप्रमाणे रुग्णालयात स्वच्छता सेवा देण्यासाठी दरपत्रक सादर करीत आहे.

| अ.क्रं. | मासिक मूळवेतन प्रति कामगार | स्वच्छता साहित्य दर प्रति कामगार | एकूण दर प्रति कामगार सर्व करांसहित |
|---|---|---|---|
| १ | | | |

सोबत:- दरपत्रक पात्रतेचे सर्व स्वत: साक्षांकित केलेले कागदपत्रे.

नाव, सही व रबरी शिक्का

D:\gawai igm data\QUOTATION\quotation.docx126

Scanned with CamScanner

व्यवसायाचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात जाहिरनामा तयार करावा.

स्वयंघोषणापत्र

७) मी / आम्ही असे जाहिर करतो की, या दरपत्रकांमध्ये किमान मुल्यांपेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. अथवा बाजारभावापेक्षा अधिक दर नमुद केलेले नाहीत. या दरपत्रकात नमुद करणेत आलेली उत्पादक कंपनी किंवा माझा व्यवसाय काळया यादीतील नाही. मी किंवा माझे व्यवसायातील नोकर वर्ग यांचा जिल्हा शल्य चिकित्सक, ठाणे किंवा त्यांचे अधिपत्याखालील संस्था यामध्ये कोणतेही नाते व हितसंबध नाहीत.

८) मी / आम्ही जाहिर करतो की, माझे / आमचे व्यवसायाचे जीएसटी वस्तू व सेवा कर यांची नोंदणी झालेली असुन वार्षिक आर्थिक उलाढाल रु. २०.०० लक्ष पेक्षा अधिक असलेने जीएसटी वस्तू व सेवा कर परतावा नियमित भरणेत येतो.

९) मी / आम्ही जाहिर करतो की, माझे / आमचे व्यवसायाचे आर्थिक उलाढाल रु. २०.०० लक्ष पेक्षा कमी असलेने जीएसटी वस्तू व सेवा कर याबाबतची नोंदणी केलेली नाही.

**वरील क्रं. (२) व (३) पैकी जे आवश्यक आहे ते ठेऊन इतर खोडावे.**

स्थळ:-

दिनांक:-

नाव, सही व रबरी शिक्का



Scanned with CamScanner

| Web site Document Upload form (WDU) | | |
|---|---|---|
| | Public Health Department – 2025-2026 | |
| Name & designation of officer | Dr. Madhavi Pandare, Medical Superintendent Sub District Hospital Bhiwandi, Post Bhiwandi, Tal. Kalyan Dist. Thane | |
| Date of Publication | 06.06.2025 | |
| Displayed on Website (Please (v) checkbox | www.nrhm.maharashtra.gov.in | www.arogya.maharashtra.gov.in |
| Published on Section/ tab of website | www.webuploadquotation@gmail.com | |
| Document Title should Be displayed as (In Marathi) | सार्वजनिक आरोग्य विभाग अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे स्वच्छता सेवा राबविण्याकरीता दरपत्रके सादर करणेबाबत. | |
| Document Title Should Be display as (In English) | Quotation Call for Cleaning Servants for Hospital Housekeeping for Sub District Hospital, Bhiwandi Under Public Health Department. | |
| Document Size (Document Should be in PDF Format and Size will not exceed more than 20 MB) | A4 KB | |

**Declaration**

I hereby declare that all Information Provided in this website document upload form (WDU) for the purpose of uploading/updating document on website only and correct to the best of my knowledge. All document responsibilities will be on concern program department only. IT NHM Department is not responsible for any breach cause to content of uploaded document.IT NHM department is responsible only for uploading/updating documents on website.

Date - 06.06.2025

MEDICAL SUPERINTENDENT CL-1
Late Smt. Indira Gandhi Memorial Hospital, Bhiwandi, Dist- Thane.

Medical Superintendent
Sub District Hospital Bhiwandi

Scanned with CamScanner